# मा. सौ. सरितताई गाखरे यांचे वर्धा जिल्हयातील कोरोना आजाराविषयक निवारण कार्य

**डॉ. तिर्थनंद बन्नगरे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय, रोहणा

## सारांश (Abstract)

लोकशाहीच्या राजकीय प्रवाहात अत्यंत महत्वाचा घटक लोकप्रतिनिधी असतो. सर्वसामान्य नागरीकांच्या आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण करण्यातही सर्वोच्य स्थानी असतो. अशा लोकप्रतिनिधींपैकी सौ. सरिताताई गाखरे (महाजन) एक आहेत. इतिहासाच्या माध्यमातून सरिताताईंच्या राजकीय कारकिर्दीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यांचा जन्म ५ एप्रिल १९८५ रोजी काटोल तालुक्यातील कोल्हू गावात झाला. त्या २२ मे २००३ ला धर्तीमुर्ती गावचे श्रीमंत देवरावजी आणि राघोबाजी गाखरे (महाजन) यांचे नातू श्रीमंत विजय मनोहरराव गाखरे (महाजन) यांचेशी विवाहबध्द झाल्या. त्यांनी महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री व दुसरे मुख्यमंत्री दादासाहेब ऊर्फ मारोतराव कन्नमवार यांच्या पदस्पर्शाने पुणीत झालेल्या वर्धा जिल्हयाच्या कारंजा (घा.) तालुक्यातील कन्नमवार गट क्र. ०५ मधून ६३२२ मतांनी विजयी होवून वर्धा जिल्हा परिषदेचे सदस्यपद फेब्रू. २०१७ मध्ये प्राप्त केले. कालांतराने ६ जाने. २०२० रोजी वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी विराजमान झाल्या. लगेच तीन महिन्यातच जगाच्या पाठीवर कोरोना आजाराचा प्रकोप वाढला. त्या आजाराची झळ वर्धा जिल्हयालाही पोहोचली. त्यातूनही धिरोदात्तपणे सरिताताईंनी मार्ग काढला. या आजाराची लागण झालेल्या ब-याच जणांचे प्राण वाचविण्याकरीता कोविड-१९ रोग नियंत्रण उपाय योजना म्हणून जिल्हयातील कोविड केअर सेंटर व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. सचिन ओंम्बासे यांची नेमणूक केली. कोरोनाच्या दोन्ही लाटांना थोपविण्याकरीता २४ प्राथमिक आरोग्य केन्द्रात कोविड केंद्र कार्यान्वीत केले. त्यामध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या ४७ आशा वर्कसना पुरस्कृत केले. उर्वरीत १०३३ वर्कसना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून प्रत्येकी १००० रु. प्रोत्साहन भत्ता दिला.

आजारी व्यक्तींना लागणा-या रक्ताकरीता स्वत: आपले गावात आयोजीत रक्तदान शिबीरात पती विजयराव गाखरेंसह रक्तदान केले. पिपरी मेघे गावातील रुग्णांना वेळीच आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध न करुन देणा-या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन तडस यांची कान उघाडणी केली. जिल्हयातील दिवसेंदिवस वाढती रुग्ण संख्या पाहता सरिताताईंनी बापुराव देशमुख अभियांत्रीक महाविद्यालय, अग्नीहोत्री अभियांत्रीक महाविद्यालय बोरगांव मेघे येथील औषधी शास्त्र महाविद्यालय कोरोना आजार सुविधा केन्द्राकरीता अधिग्रहीत करण्याचा निर्णय घेतला. आपले जीवाची पर्वा न करता संपुर्ण वर्धा जिल्हयाच्या कानाकोप-यातील आरोग्य केन्द्रांना वेळी अवेळी भेटी दिल्या. गरजू आरोग्य केन्द्रांना उत्तम गल्वा कंपनीच्या सीएसआर फंडातून ऑक्सीजन कास्ट्रेटर भेट दिले. कारंजा घाडगे आरोग्य केंद्राला जनरेटर भेट देणा-या प्रशांत धारपुरे यांचे अभिनंदन केले. भुगाव येथील उत्तम गाल्वा मेटॅलीक कंपनीकडून १६ कॉन्ट्रेटर्स मिळविले. केन्द्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचेकडून ५५ प्राणवायू एक्सरे प्रिंटरचे दोन संच लोकार्पीत केले. नारा आरोग्य केन्द्रातील कर्मचारी भरतीकरीता वर्धेच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ७ जुलै २०२१ रोजी लाक्षणिक उपोषण करुन रातोरात पदभरतीस महाराष्ट्र सरकारला मंजूरी देण्यास भाग पाडले. त्यांच्या जिल्हाध्यक्षपदाच्या ८०७ दिवसाच्या कारकिर्दी अखेरील दिवसात मार्च २०२२ मध्ये जिल्हयाचे पालकमंत्री ना. सुनिल केदार आणि आर्वीचे आमदार दादाराव केचे यांचे उपस्थितीत नारा गावातील ६४ लाख रुपये खर्च करुन बांधकाम केलेल्या आरोग्य केन्द्राचे उद्घाटन करुन घेतले.

**बिज संस्था** (Key words)

मा. सौ. सरिताताई गाखरे यांचे कोरोना आजार काळातील आरोग्य आणि विकासात्मक कार्य

## शोधनिबंधाची उद्दीष्टे (Objective of Research Paper)

१. कोरोना आजाराने ग्रस्त व्यक्तींकरीता रक्तदान शिबीराचे आयोजन

२. जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केन्द्रांना ऑक्सीजन आणि कॉन्स्ट्रेटर उपलब्ध करणे.

३. कोविड केन्द्राकरीता वरिष्ठ महाविद्यालयांच्या इमारती उपलब्ध करणे.

४. आरोग्य केन्द्रातील कर्मचा-यांच्या भरतीकरीता शासनाकडे पाठपुरावा करणे.

५. वर्धा जिल्हा परिषदेला महाराष्ट्र सरकारचा उत्कृष्ट पुरस्कार मिळवून देणे.

६. नागपूर अमरावती महामार्गावरील कारंजा (घाडगे) येथील उड्डाण पुलाला केन्द्र सरकारकडून परवानगी मिळविणे.

७. वर्धा जिल्हयातील अनेक ठिकाणी केन्द्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे हस्ते विकासाच्या हेतूने भुमीपुजन आणि उद्घाटने करुन घेणे.

**गृहीतके (Hypothesis)**

पुर्व विदर्भातील वर्धा जिल्हयातील कोरोना आजार काळातील सरिताताईंचे विकासात्मक योगदान महत्वपूर्ण आहे.

**संशोधनाची पद्धत** (Research of Methodology)

प्रस्तुत शोधनिबंध प्रथम आणि दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेला आहे. या शोध निबंधाकरीता विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे आंतरराष्ट्रीय जर्नल्स, इंटरनेट, स्मरणीका इत्यादी द्वारे माहीतीचे संकलन करुन प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

१. धर्ती गावात रक्तदान शिबीराचे आयोजन

२. शेष फंडातून आशा वर्कसना अतिरीक्त मानधन देण्याची तरतूद.

३. कारंजा (घा.) येथील आरोग्य केन्द्राला जनरेटर भेट देणा-या प्रशांत धारपुरे यांचे अभिनंदन

४. कन्नमवार ग्राम येथील आरोग्य केन्द्राला ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर भेट.

५. नारा प्राथमिक आरोग्य केन्द्रातील पदभरती करीता लाक्षणीक उपोषण.

६. नारा आरोग्य केन्द्राचे लोकार्पण

७. भालेवाडी गावच्या आपदग्रस्त व्यक्तींचे सांत्वन.

८. जिल्हा परिषदेतील अवेळी येणा-या कर्मचा-यांकडून पर्यावरणाला मदत करण्याची सक्ती.

## प्रस्तावना (Introduction)

आधुनिक काळात स्त्रीयांनी आपल्या स्वर्कृत्वाने स्वत:ची विविध क्षेत्रातील कोंडी फोडली. त्यापैकी मोजक्या स्त्रीयांचीच नोंद इतिहासाने घेतली आहे. अशा स्त्रीमध्ये सरितातार्इ एक आहे. नागपूर आणि वर्धा जिल्हयाच्या सीमेवर कोल्हू या गावी कुसुमताई हनमंतराव देशमुखांचे घरी ५ एप्रिल १९८५ रोजी त्यांचा जन्म झाला.

वर्धा जिल्हा म्हणजे साक्षात पावनभूमी, या जिल्हयाने आष्टीहून क्रांतीचा संदेश, तर सेवाग्रामहून शांतीचा संदेश दिला. संत-महंत क्रांतीकारक नेते मंडळीच्या पदस्पर्शाने पुनीत झालेला जिल्हा आहे. या जिल्हयाच्या विकासात अनेक क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी हातभार लावला. त्यामध्ये कारंजा घाडगे तालुक्यातील कारंजा (घाडगे) मार्गावरील धर्ती गावच्या महाजन सौ. सरिता विजय गाखरे हया कोल्हू-धर्तीच्या लेकसून आहे. त्यांनी दि. ०६ जानेवारी २०२० रोजी वर्धा जि.प. अध्यक्षपदाची राजसुत्रे हाती घेतली. काही दिवसातच लगेच, जगाच्या पाठीवर कोरोनाचा प्रकोप वाढला. त्याची झळ वर्धा जिल्हयालाही पोहोचली. त्यातूनही धिरोदात्तपणे सरितातार्इंनी मार्ग काढला. या आजाराची लागण झालेल्या ब-याच जणांचे प्राण वाचविण्याकरीता कोविड-१९ रोग नियंत्रण उपाय योजना म्हणून जिल्हयातील कोविड केअर सेंटर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. सचिन ओम्बासे यांचेकडे जबाबदारी सोपविली. कोरोनाच्या दोन्ही लाटांना थोपविण्याकरीता २४ प्रा.आ. केन्द्रात कोविड केअर सेंटर कार्यान्वीत केले यामध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या ४७ आशा स्वयंसेविकांना पुरस्कृत तर १०३३ वर्कर्सना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून प्रत्येकी एक हजार रुपये प्रोत्साहन भत्ता मंजूर केला.

**सरितातार्इंनी केलेल्या कार्याची अंमलबजावणी**

*** धर्ती गावात रक्तदान शिबीराचे आयोजन**

भारताचे मा. पंतप्रधान नरेन्द्र मोदीजी यांचे वाढदिवसानिमित्ताने वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मा.ना.सौ. सरितातार्इ गाखरे (महाजन) यांनी कारंजा (घाडगे) तालुक्यातील स्वत:चे धर्ती गावामधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दक्षता समिती आणि ग्रामपंचायत धर्तीच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ सप्टेंबर २०२० ला रोज बुधवारी हनुमान मंदीर येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले. या शिबीराचे उद्घाटन जिल्हा

परिषद अध्यक्षा सौ. सरितातार्इ गाखरे यांनी केले. याप्रसंगी मुकून्द्रजी बारंगे, विनायक भांगे, सरपंच रामेश्वर धारपुरे, उपसरपंच ज्ञानेश्वर मानमोडे, प्रविण खवशी, गुलाबराव गि-हाळे, सतीश देवासे उपस्थित होते. या शिबीरात स्वत: आणि पती विजय मनोहरराव गाखरे (महाजन) यांचेसोबत रक्तदान केले. शिबीरात एकूण पंचवीस रक्तदात्यांनी रक्तदान करुन देशाचे मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदीजी यांचा जन्मदिन धर्ती या भारताच्या इतिहासात प्रथमत: साजरा करण्यात आला.

*** आशा वर्कर्सना अतिरिक्त मानधन देण्याची तरतुद**

सरितातार्इ गाखरे यांच्या जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र सरकारने उत्कृष्ट जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून त्यांना गौरवान्वीत केले. शरीर संपत्ती ही सर्वश्रेष्ठ संपत्त् आहे. ती सुरक्षित राहावी याकरीता सरितातार्इने स्वत:च्या जीवाची पर्वा न करता जिल्हयातील लोकांना आरोग्यविषयक साधनाची कमतरता भासू दिली नाही. कोरोना काळात कारंजा (घाडगे) पंचायत समितीमध्ये आरोग्य विषयक साधनांच्या अडचणी समजून घेतल्या. प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये कार्यरत असणा-या ज्या बी.ए.एम.एस. डॉक्टरांनी चांगले कार्य केले. त्यांचे मानधनात अतिरीक्त वाढ करण्याकरीता सरितातार्इंनी जिपच्या स्थायी सभेत ठराव संमत केला. आशा वर्कर्सना सेस फंडातून अतिरीक्त मानधन देण्याची तरतुद केली.

कोविड आजारांचा वाढता प्रादुर्भाव व रुग्णांना ऑक्सीजनची जाणवणारी कमतरता लक्षात घेता त्या गावातील पिपरी मेघे गावात ग्रामपंचायतचे सरपंच अजय गोळकर यांचेकडे विनंतीने सरितातार्इंनी दोन ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर व पाच जंबो ऑक्सीजन सिलेंडर रुग्णालयाला भेट दिले. पिपरी गावातील आनंद चांदेकर यांचे कोरोना आजाराने घरीच निधन झाले. त्यांचेसाठी नातेवार्इकांनी रुग्णवाहीका मागण्यासाठी जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. तडस यांचेकडे भ्रमणध्वनीवर वारंवार संपर्क केला तेव्हा त्यांनी योग्य प्रतिसाद दिला नाही. परंतु जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अजय डवले यांनी रुग्णवाहिकेची व्यवस्था करुन देण्यास सरितातार्इंनी भाग पाडले. महामारीचे काळात आरोग्य विषयक सहकार्य करीत नसल्याचा ठपका ठेवून डॉ. सचिन तडस यांची आभासी सभेत चांगलीच कानउघाडणी केली.

कोरोना रुग्णांची वाढती संख्या पाहून बि.डी. इंजिनियरींग कॉलेज, अग्नीहोत्री इंजिनियरींग कॉलेज, बोरगांव (मेघे) येथील औषधी शास्त्र महाविद्यालय वर्धा येथील

इंद्रप्रस्थ महाविद्यालय कोविड केअर सेंटर करीता अधिग्रहीत करण्याचा पर्याय सरितातार्इंनी केन्द्रीय मंत्री मा.ना. नितीन गडकरी तसेच वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री सुनिल केदार यांना कळविले.

*** कारंजा (घा.) येथील आरोग्य केन्द्राला जनरेटर भेट देणा-या प्रशांत धारपुरे यांचे अभिनंदन**

कोविड आजाराचा आढावा घेण्याकरीता संपूर्ण वर्धा जिल्हयाभर तुफानी आणि झंझावाती दौरे करुन प्रत्येक आरोग्य केन्द्राच्या अडचणी जाणून घेतल्या. समुद्रपूर तालुक्यातील गिरड येथील आरोग्य केन्द्राला वर्धा येथील आरोग्य केन्द्राला वर्धा येथील उत्तम गल्वा कंपनीच्या सीएसआर फंडातून आरोग्य विषयक ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर भेट दिले. तळेगांव येथील आरोग्य केन्द्राच्या बांधकामाकरीता पाच लाख साठ हजार रुपये निधी मंजुर केला. कानगावच्या प्राथमिक आरोग्य केन्द्रातील पाच जुने कपाट इतरत्र कसे पोहोचले याबाबतीत चौकशी लावली. २०२०-२१ च्या अंतीम, सुधारीत अंदाजपत्रकात दहेगांव (गोंडी) येथील प्राथमिक आरोग्य केन्द्र इमारतीच्या दुरुस्तीची जि.प. सदस्य लाखे यांनी मागणी केली. तेव्हा ती मागणी ताबडतोब मंजुर केली. तसेच हिंगणी येथील आरोग्य कर्मचा-यांच्या निवास स्थानाकरीता अतिरीक्त निधी मंजुर केला. एप्रिल २०२१ मध्ये कोरोना आजाराला नियंत्रणात आणण्याकरीता आरोग्य यंत्रणेकडे प्राणवायू, व्हेंटीलेटर उपलब्ध आहे याचा अंदाज घेतला. त्यानंतर उपचाराअभावी कोणत्याही कोविड रुग्णाचा मृत्यु होवू नये म्हणून जिल्हा आरोग्य प्रशासनाला सेवाग्राम आणि सावंगी येथील रुग्णालयात पेशंटची व्यवस्था लावण्याचे निर्देश दिले. ताबडतोब उपाययोजना म्हणून रुग्णालयात पंजीबध्द खाजगी डॉक्टर परिचारीकांची सेवा घेण्याचा निर्णय घेतला. जिल्हयाच्या कारंजा (घाडगे) येथील रुग्णालयाला राजनी गावातील प्रशांत धारपुरे या युवकाने ६२५ के.व्ही. चे पाच लाख ४० हजार रुपयाचे जनरेटर भेट दिले. त्या दानदात्या युवकाचे जि.प. अध्यक्ष या नात्याने सरितातार्इंनी हार्दीक अभिनंदन केले.

*** कन्नमवार ग्राम आरोग्य केन्द्राला ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटरची भेट**

भुगाव येथील उत्तम गाल्वा मेटॅलीक कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करुन १६ कॉन्स्ट्रेटर्स मिळवून घेतले. हे सर्व कॉन्स्ट्रेटर्स वर्धा मुख्यालयापासून दुर इंरियलमध्ये असणा-या केन्द्रामध्ये पाविले. केन्द्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना सरितातार्इंनी वर्धा

जिल्हयाकरीता ५५ प्राणवायू कॉन्स्ट्रेटरची मागणी केली. तेव्हा त्यांचे सहकार्यातून मिळालेले कॉन्स्ट्रेटर नितीनजींचे जन्मदिनाचे औचित्य साधून इडशी व हमदापूर प्रामिक आरोग्य केन्द्रांना दिले. त्यानंतर आंजी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता सरितातार्ईनी ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर आणि रुग्णवाहीका उपलब्ध केली. साहूर, कन्नमवार ग्राम, सारवाडी, जळगांव, खरांगणा (मो.), नारा येथील प्राथमिक आरोग्य केन्द्रांना ऑक्सीजन कॉन्स्ट्रेटर वितरीत करुन गरजू रुग्णांची व्यवस्था लावली. आर्वी येथील उपजिल्हा रुग्णालयात नानाजी देशमुख प्रतिष्ठाणच्या माध्यमातून सुमित वानखडे यांनी रुग्णालयाला आवश्यक असलेली डिजीटर एक्सरे प्रिंटरचे दोन संच दिले. ते सरितातार्ई गाखरे यांनी आर्वी विधानसभेचे आमदार दादाराव केचे यांचे उपस्थितीत रुग्णालयात लोकार्पीत केले.

*** नारा आरोग्य केन्द्रातील पदभरतीकरीता लाक्षणिक उपोषण**

कारंजा तालुक्यातील नारा गावामध्ये सहा कोटी ६४ लाख रुपये खर्च करुन इमारत बांधली. परंतु राजकारणी लोकांचे कारनाम्यामुळे कोरोना काळातही तेवीस गावांचे रुग्णांना या इमारतीचा पाहीजे तसा उपयोग घेता आला नाही म्हणून पदभरती करीता भर पावसात सरितातार्ईनी ७ जुलै २०२१ रोजी वर्धा येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले. तेव्हा रातोरात महाराष्ट्र शासनाने पदे भरण्यास मंजुरी दिली. या आरोग्य केन्द्राचे जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. सुनिल केदार यांच्या हस्ते व आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार दादाराव केचे यांचे प्रमुख उपस्थितीत सरितातार्ई गाखरे यांनी उद्धाटन केले. हे अवघड कार्य भल्या भल्या आर्वी येथील राजकारण्यांना जमले नाही. ते जिल्हयातील एका धर्ती अध्यक्षांची करुन दाखविले. अशा कर्तबगार सरितातार्ईचा महाराष्ट्र सरकारने उत्कृष्ट जिल्हयाध्यक्ष म्हणून केन्द्रीय मंत्री कपील पाटील यांचे हस्ते पुरस्कृत केले.

*** नारा येथील आरोग्य केन्द्राचे लोकार्पण**

कारंजा तालुक्यातील नारा गावामध्ये सहा कोटी ६४ लाख रुपये खर्च करुन इमारत बांधली परंतु राजकारणी लोकांचे कारनाम्यामुळे कोरोना काळातही तेवीस गावाचे रुग्णांना या इमारतीचा पाहीजे तसा उपयोग घेता आला नाही म्हणून पदभरती करीता भर पावसात सरितातार्ईनी ७ जुलै २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वर्धा येथे लाक्षणिक उपोषण केले. तेव्हा रातोरात महाराष्ट्र शासनाला पदे भरण्यास मंजुरी दिली. या आरोग्य केंद्राचे जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. सुनिल केदार यांच्या

हस्ते व आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार दादाराव केचे यांचे प्रमुख उपस्थितीत सरिताताई गाखरे यांनी उद्घाटन केले. हे अवघड कार्य भल्याभल्या आर्वी येथील राजकारण्यांना जमले नाही ते जिल्हयातील एका महिला अध्यक्षांनी करुन दाखविले. अशा कर्तबगार सरिताताईंचा उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष म्हणून केंद्रीय मंत्री कपील पाटील यांचे हस्ते सत्कार झाला. महाराष्ट्रातील या कर्तबगार माजी जिल्हाध्यक्षांचे कार्य खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. ही त्यांची आरोग्यविषयक सुविधा तातडीने उपलब्ध करण्याचे कार्य महान आहे.

*** भालेवाडी गावाच्या आपदग्रस्त व्यक्तीचे सांत्वन**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कारंजा (घाडगे) तालुक्याला सरिताताईंच्या रुपाने प्रथमत:च वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाचा मान मिळाला. ही घटना कारंजा (घाडगे) तालुक्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहील्या गेली. जिल्हाध्यक्षपदाची धुरा हाती घेतल्याच्या काही दिवसातच खरांगणा येथील दांडेकर हा जवान शहीद झाला. त्यांचे पार्थीवाचे खासदार रामदास तडस, आमदार दादाराव केचे यांचे बरोबर दर्शन घेत असतांना सरिताताई हळूवार झाल्या त्यांची देवयानी ही छोटीशी मुलगी घरी येण्याची भिर-भिर वाट पाहत असे. कोरोना महामारीच्या काळात कुठलीही तमा न बाळगता कन्नमवार ग्राम, कारंजा घाडगे, रोहणा, आर्वी, आष्अ, सेलु, समुद्रपूर येथील ग्रामीण शहरी रुग्णालयांच्या समस्या जाणून घेण्यासाठी झंझावाती दौरे केले. तसेच वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री सुनिल केदार, खासदार रामदास तडस, स्व. वामनराव दिवे चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सुधीरजी दिवे, आर्वीचे आमदार दादारावजी केचे, आमदार रणजित कांबळे, आमदार डॉ. पंकज भोयर, डॉ. रामदास आंबटकर विधान परिषद सदस्य, आमदार समीर कुणावार यांचेशी बैठका घेवून जिल्हयाच्या विकासाचा आराखडा तयार केला तसेच नागपूर अमरावती महामार्गावरील कारंजा (घाडगे) येथील उड्डाण पुलाचे कामाची मंजुरी मिळविली. गवराळू गाईसाठी हेटीकुंडी हे गाव प्रसिध्द आहे. कारंजा (घाडगे) आणि आर्वी तालुक्यात जिल्हास्तरीय गवराळू पशुंचे प्रदर्शन भरविले. मागील वर्धा जिल्हयातील भालेवाडी गावातील आगीत नुकसान झालेल्या व्यक्तीचे आमदार दादाराव केचे आणि सरिताताईने मदतपर सांत्वन केले. हिंगणघाट येथील अंकीता पिसुड्डे हिला पेट्रोल टाकून जाळले. त्या घटनेचा निषेध म्हणून कारंजा घाडगे येथे नाकर्त्या सरकारचा फलक हाती घेवून निषेध नोंदविला.

*** जिल्हा परिषदेतील अवेळी येणा-या कर्मचा-यांकडून एक कुंडी व एक झाड आणून देण्याची सक्ती**

वर्धा येथील आंतरराष्ट्रीय हिन्दी विद्यापीठात आयोजीत आंतरराष्ट्रीय परिषदेला भारत सरकारचे मंत्री भाजपाचे ज्येष्ठ नेते मा. नितीनजी गडकरी आले असताना जिल्हयातील बरीच भूमीपुजने व उद्घाटने सरितातार्इंनी वर्धा येथे करुन घेतली. पदवीधर विधानसभा मतदार संघातील नागपुरचे उमेदवार श्री. संदीपजी जोशी यांच्या प्रचारात जिल्हयात त्या आघाडीवर राहील्या. स्वत:चे समजूतदार स्वभावामुळेच जिल्हा परिषदेत उशिरा कामावर बेशिस्तपणे येणा-या अनेक कर्मचा-यांचे फुल देऊन स्वागत केले. त्यांचेवर कुठलीही कारवाई न करता पर्यावरणाला हातभार म्हणून जिल्हा परिषदेत एक कुंडी आणि एक झाड आणून देण्याची सक्ती केली. म्हणूनच आज घडीला संपूर्ण जिल्हा परिषदेत इंडोर प्लान्ट सर्वत्र दिसतात. सरितातार्इंनी जनतेच्या समस्या मोठया धैर्याने सोडविल्या.

## निष्कर्ष (Conclusion)

लोकशाहीच्या राजकीय प्रवाहात लोकप्रतिनिधी नागरिकांच्या सर्वोच्च स्थानी असते. त्यामध्ये अल्पावधीतच सरितातार्इला प्रचंड लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचण्याचा मान मिळाला. राजकारणापेक्षा विकासात्मक कार्यात सरितातार्इंनी स्वत:ला झोकून दिले. त्यांचा जि.प. अध्यक्षपदाचा ८०६ दिवसाचा राजकीय प्रवास खरोखरच वाखाणण्याजोगा आहे. जिल्हयात स्वत:ची एक वेगळी छाप निर्माण करण्यात त्या यशस्वी ठरल्या. इ.स. २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन वर्षात नैसर्गिक राष्ट्रीय आपत्ती म्हणून कोरोना-१९ या संसर्गजन्य रोगाचे महाभयंकर संकट देशासह वर्धा जिल्हयावरही आले असतांना या रोगाचे निवारण करण्याकरीता सरितातार्इने स्वत:च्या मुलांची व कुटुंबियांची पर्वा न करता स्वत:चा जीव धोक्यात टाकून टाळेबंदीच्या काळात जिल्हाभर लोकमाणसांकरीता पुरेशा आरोग्यविषयक सोयी उपलब्ध करुन देण्याकरीता जिल्हयातील जागोजागच्या प्राथमिक आरोग्य केन्द्रांना भेटी दिल्या व त्यातील आरोग्य विषयक सुविधांची उणीव भरुन काढली. आर्वी, आष्टी व कारंजा (घाडगे) तालुक्यातील गरीब रुग्णांना स्वखर्चाने वर्धा सेवाग्राम येथे उपचारार्थ दाखल केले. त्यांच्या जेवण व राहण्याची उत्तम व्यवस्था केली. ही मानवता कठीण प्रसंगी

सौ. सरितताई गाखरे यांनी दाखविली. हे त्यांचे कार्य खरोखरच वाखाणण्या योग्य आहे.

## संदर्भ सूची (Bibliography)


१. दौरा दैनंदिनी, लॉग बुक, जि.प. वर्धा

२. प्रभाग साप्ताहीक, २२ नोव्हेंबर २०२१, अंक तिसरे

३. दै. लोकमत आणि नवभारत, दि. २४ फेब्रू. २०१७

४. दै. तरुण भारत, पुण्यनगरी, नवराष्ट्र, लोकमत, दि. ०७ जाने. २०२०

५. दै. सकाळ, देशोन्नती, नवराष्ट्र, दि. १८ जाने. २०२०

६. News Paper Hitwad, Date 04 March 2021

७. संकल्पपुर्ती, जिल्हा परिषद वर्धा, २०१७ ते २०२२

८. दै. महासागर, ०५ एप्रिल २०२१

९. News Paper Hitwad, Date 05 April 2021

१०. पुरवणी, दै. महासागर, ०५ एप्रिल २०२१

११. आंतरराष्ट्रीय जर्नल, जुलै २०२१, आधार पब्लीकेशन अमरावती.

१२. News Paper Hitwad, Date 19 September 2020

१३. पुरवणी, ०५ एप्रिल २०२२, दै. महासागर

१४. मुलाखत, अध्यक्ष वर्धा जिल्हा परिषद सौ. सरिताताई गाखरे, वेळ २.०० वा.
दि. ०४ जुलै २०२१

१५. Search, Google Internet

१६. Gazeteer, District Wardha

१७. प्रत्यक्ष, सर्वेक्षण, दि. ३० जाने. २०२१

१८. श्री. विजय गाखरे यांचे प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मिळालेली माहीती.

१९. पुरवणी, दै. महासागर, ०१ जुलै, २०२२